**माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत स्वता:शीच संबंधीत माहिती अर्ज वा अपील अर्ज निकाली न काढण्याबाबत**

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग**
**शासन परिपत्रक क्र.संकिर्ण २०१६ /प्र.क्र.(१५५/१६) सहा.**
मंत्रालय, मुंबई - ४००० ३२.
दिनांक- ७.९.२०१६.

परिपत्रक:-

माहिती अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत माहिती मागविणाऱ्या अर्जदारांकडून काही वेळा संबधीत जन माहिती अधिकाऱ्याची वा प्रथम अपील अधिकाऱ्याची वैयक्तीक माहिती मागीतली जाते. वैयक्तीक स्वरूपाची माहिती उपलब्ध न झाल्यास अशा अर्जदारांकडून प्रथम अपील केले जाते. काही वेळा ज्या जन माहिती अधिकाऱ्याकडून वा प्रथम अपील अधिकाऱ्याकडून त्याच्या स्वत:शी संबंधीत माहिती मागविण्यात येते तेच अधिकारी असे माहिती अर्ज किंवा अपील अर्ज निकाली काढतात असे निदर्शनास आले आहे. अशाच स्वरूपाच्या एका प्रकरणी प्रथम अपील अधिकाऱ्याची वैयक्तीक माहिती मागीतली असता त्यांनीच त्या प्रकरणी निर्णय दिल्याचे दिसते. No man can be a judge in his own cause हे न्यायदानाचे मूळ तत्व विचारात घेता, स्वत:शी संबंधीत असलेल्या प्रकरणात संबंधीत माहिती अधिकारी वा प्रथम अपील अधिकाऱ्याने स्वत:च निर्णय घेणे उचित नाही व अशा प्रकरणात संबंधीत सार्वजनिक प्राधिकरणाने दुसऱ्या जन माहिती अधिकाऱ्याची/ प्रथम अपील अधिकाऱ्याची नियुक्ती करणे आवश्यक वाटते. या अनुषंगाने सर्व विभागांना सूचित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. तदनुसार शासन पुढीलप्रमाणे सूचित करीत आहे.

२. माहिती अधिकार अधिनियम, २००५ अन्वये कोणत्याही शासकीय अधिकाऱ्याची/कर्मचाऱ्याची वैयक्तीक माहिती मागविलेली असल्यास संबंधीत अधिकारी/कर्मचाऱ्याने त्याबाबत स्व:ताच निर्णय करू नये. अशा माहिती अधिकार प्रकरणी संबंधीत सार्वजनिक प्राधिकरणाने, अन्य जन माहिती अधिकारी वा प्रथम अपील अधिकाऱ्याची त्या विनिर्दिष्ट प्रकरणी नियुक्ती करावी.

३. उपरोक्त परिपत्रकातील तरतूदी सर्व मंत्रालयीन विभाग प्रमुखांनी त्यांच्या अधिपत्याखालील विभाग प्रमुख, सार्वजनीक प्राधिकरण तसेच सर्व संबंधीतांच्या निदर्शनास आणून द्याव्यात व तदनुसार आवश्यक कार्यवाही करण्याबाबत त्यांना सूचित करण्यात यावे.

Scanned with ACE Scanner

४ सदर परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा सांकेतांक क्र. २०१६०९०७१५२१३०६४०७ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

Rajendra M Jadhav

Digitally signed by Rajendra M Jadhav
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=GENERAL ADMINISTRATION DEPT., postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=656ebca17998fd5c29178a5abcf1aa60d72bd5515ddc791d9ad9786418f07e4f, cn=Rajendra M Jadhav
Date: 2016.09.07 15:22:59 +05'30'

(रा.मा.जाधव)
शासनाचे उप सचिव.

---

**बृहन्मुंबई महानगरपालिका**

सामान्य प्रशासन विभाग

**परिपत्रक**

क्र. एमओएम/६५ दि.११.०४.२०२५

विषय:-माहिती अधिकार अधिनियम,२००५ अंतर्गत स्वत:शीच संबंधीत माहिती अर्ज वा अपील अर्ज निकाली न काढण्याबाबत.

संदर्भ:-परिपत्रक क्र.संकीर्ण २०१६/प्र.क्र.(१५५/१६)सहा. दि.०७.०९.२०१६

शासनाचे उप सचिव,सामान्य प्रशासन विभाग,महाराष्ट्र शासन यांचे संदर्भाधीन सोबत जोडलेले परिपत्रक कृपया पहावे.

त्याअनुषंगाने सर्व खाते/विभाग प्रमुख यांनी त्यांच्या अखत्यारीतील सर्व उपविभागातील जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांना सदर परिपत्रकांतील निदेशांनुसार कार्यवाही करण्याच्या सूचना द्याव्यात.

| | | | |
|---|---|---|---|
| सही/-२५.०३.२०२५ | सही/-२७.०३.२०२५ | सही/-०२.०४.२०२५ | सही/-०६.०४.२०२५ |
| (शारदा गोसावी) | (किशोर गांधी) | (डॉ.अश्विनी जोशी) | (भूषण गगराणी) |
| प्रमुख कर्मचारी अधिकारी | उप आयुक्त (सा. प्र.) | अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (शहर) | महानगरपालिका आयुक्त |

प्रकअ/१६९
२०२४-२५

सामान्य प्रशासन विभाग
क्र. एमओएम/६५दि.११.०४.२०२५

प्रत:------------------------------------------------------------------यांना
माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

(श्रीम. लीना ता. शिंदे)
रचना व कार्यपध्दती अधिकारी (आयुक्त कार्यालय)



Scanned with ACE Scanner